जाहिरात क्र. ------, दि.

पुणे महानगरपालिका
जाहिरात प्रकटन

आरोग्य कार्यालयाअंतर्गत खालील अस्थायी पदावर सहा महिने करिता, करार पद्धतीने, एकवट मानधनावर सेवा घ्यावयाची असल्याने अनुभवधारक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | पदाचे नाव | एकवट मासिक मानधन रुपये | शैक्षणिक अर्हता | अनुभव | एकूण पदांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १. | प्रयोगशाळा तंत्रज्ञ (वर्ग-३) | ३०,००० | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची रसायनशास्त्र, जीवशास्त्र वा सूक्ष्मजीव शास्त्र या विषयातील पदवी.<br>ब) मान्यताप्राप्त संस्थेची डी.एम.एल.टी. परीक्षा उत्तीर्ण. | अनुभव असल्यास प्राधान्य. | ५० |
| २. | प्रयोगशाळा सहाय्यक (वर्ग-३) | २०,००० | अ) उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण व मान्यता प्राप्त संस्थेची डी.एम.एल.टी. पदवी.<br>ब) शास्त्र शाखेचा पदवीधर आणि डी.एम.एल.टी. पदवीधारकास प्राधान्य. | अनुभव असल्यास प्राधान्य. | ५४ |
| ३. | ई. सी. जी. टेक्निशियन (वर्ग-३) | ३०,००० | अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची विज्ञान शाखेची पदवी (भौतिकशास्त्र/ इलेक्ट्रोनिक्स या विषयासह विज्ञान शाखेची पदवी.<br>ब) शासन मन्यता प्राप्त संस्थेतून हृदयस्पंदन आलेख तंत्रज्ञ ( ई.सी.जी. टेक्निशियन) या विषयाचे प्रशिक्षण पूर्ण. | अनुभव असल्यास प्राधान्य. | १० |

अटी – १. वयोमर्यादा : खुल्या वर्गातील उमेदवाराचे वय जाहिरातीचे दिनांकास ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे व मागासवर्गीय उमेदवारांसाठी वयोमर्यादा ५ वर्षाने शिथिल असेल. २. वरील शैक्षणिक पात्रता व अनुभव आवश्यक. ३. सदरचे पद अत्यंत अस्थायी स्वरुपाचे आहे. ४. सदर पदाच्या नेमणुका walk-in interview (objective assesment) पद्धतीने करण्यात येईल. ५. उमेदवारांनी पात्रता व अनुभवाच्या मूळ कागदपत्रांसह हजर राहणे आवश्यक आहे. ६. उमेदवारांनी एक पासपोर्ट आकाराचा फोटो व आवश्यक मूळ कागदपत्रांच्या छायांकित सत्यप्रतीचा एक संच सादर करणे आवश्यक आहे. ७. अर्ज करताना उमेदवारांची जन्मतारखेच्या पुराव्यासाठी जन्मतारखेचा दाखला किंवा शाळा सोडल्याच्या दाखल्याची साक्षांकित प्रत अथवा जन्मतारखेची नोंद असलेली शालांत परीक्षेच्या उत्तीर्ण सर्टिफिकेटची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक. ८. उमेदवार मागासवर्गीय असल्यास जातीचा स्पष्ट उल्लेख करून कोणत्या प्रवर्गात मोडत आहे याचा उल्लेख करावा. ९. अर्जदार महिला असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे (शासनमान्य). १०. विहित पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज अपूर्ण किंवा चुकीचे भरलेले अर्ज, वय शैक्षणिक अर्हता गुणपत्रक, जातीचा दाखला, अनुभव इ. संदर्भातील आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित सत्य प्रती (झे- कॉपी) जोडले नसलेले अर्ज अपात्र समजण्यात येतील. ११. निवड झालेल्या उमेदवारांना विहित नमुन्यात करारनामा करून फक्त ६ महिन्यांकरिता नेमणूक दिली जाईल. १२. येणाऱ्या उमेदवारांनी स्वखर्चाने उपस्थित राहावे

जातील. १३. वरील पद हे अस्थायी स्वरूपाचे असल्याने या पदावर कायमस्वरूपाची नियुक्ती मागण्याचा हक्क असणार नाही. १४. वरील पदासाठी कामाचे स्वरूप ठरविण्याचे अधिकार मा. खातेप्रमुख यांना राहील. १५. सदर पदांना दररोज ८ तास (रुग्णालयाच्या सोयीनुसार) सेवा देणे बंधनकारक असेल तथापी पदांची कामकाजाची वेळ निश्चित करण्याचे अधिकारी खातेप्रमुख यांचे असतील. १६. अपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. १७. निवडविलेल्या उमेदवारास नियुक्ती देण्याबाबतचे सर्व अधिकारी मा. महापालिका आयुक्त यांनी स्वतःकडे राखून ठेवले आहेत. या बाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही. १८. रिक्त पदांच्या संख्येत कमी/ जास्त बदल होण्याची शक्यता आहे. त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. पदांची संख्या समांतर आरक्षण या बाबत बदल करणे, मुलाखत स्थगित करणे व रद्द करणे, अंशतः बदल करणे या बाबतचे सर्व अधिकारी मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका हे स्वतःकडे राखून ठेवतील. या बाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही. १९. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार अर्हताधारण करणारा न आढळल्यास, गैरवर्तन करताना आढळल्यास, दबाव तंत्राचा वापर करताना आढळल्यास उमेदवारी आपोआप रद्दबातल होईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

वरील प्रमाणे नमूद केलेली शैक्षणिक पात्रता धारण केलेल्या व अनुभवधारक उमेदवारांनी, 18/07/2020 दु. १२ ते ३ या वेळेत छत्रपती शिवाजी महाराज सभागृह, आरोग्य कार्यालय, तिसरा मजला, पुणे महानगरपालिका, मुख्य इमारत, शिवाजीनगर, पुणे – ४११००५ येथे विहित नमुन्यातील अर्ज आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती सह उपस्थित राहावे. उमेदवाराने सादर करावयाचा विहित नमुन्यातील अर्ज पुणे महानगरपालिकेच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे अथवा कार्यालयामार्फत देण्यात येईल.

(डॉ. रामचंद्र हंकारे)
आरोग्य अधिकारी
पुणे महानगरपालिका

(रुबल अगरवाल) 3/7/2020
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका